श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,

# तोष्णीवाल कला, वाणिज्य एवं विज्ञान महाविद्यालय, सेनगांव

## ता. सेनगांव जि. हिंगोली

## ''वार्षिक स्नेह संमेलन फेब्रुवारी—२०२०''

दिनांक ०८ फेब्रुवारी २०२०

---

अहवाल

सेनगांव येथील तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन फेब्रुवारी —२०२० चे आयोजन दिनांक ०८ फेब्रुवारी २०२० शनिवार रोजी करण्यात आले. पहिल्या सत्रात संमेलनाचे उद्‌घाटन सहयोगी प्राध्यापक डॉ. रामकृष्ण बदने, ग्रामीण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वसंतनगर (कोटग्याळ) ता. मुखेड जि. नांदेड यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आले. वार्षिक स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य एस. जी. तळणीकर तर प्रमुख उपस्थिती सांस्कृतिक विभाग प्रमुख व वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.डॉ. विजय वाघ, वाणिज्य शाखेचे विभाग प्रमुख प्रा.डॉ. संजीव अग्रवाल व आय.क्यू.ए.सी.चे समन्वयक प्रा.डॉ.राजेश जोशी हे मंचावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक प्रा.डॉ. विजय वाघ यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी महाविद्यालयात अभ्यासा सोबतच विद्यार्थी आपल्या विविध कला गूणाचे सादरीकरण यशस्वीपणे करतात. व महाविद्यालयात वाद—विवाद, वक्तृत्व, कवितावाचन, नाटीका इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते व विद्यार्थी मोठया संख्येने त्यामध्ये सहभागी होतात असे त्यानी सांगीतले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा परीचय आपल्या खास शैलीत प्रा.डॉ. योगेश नलवार यांनी करून दिला.

प्रा.डॉ. रामकृष्ण बदने यांनी स्नेह संमेलनातून विद्यार्थ्यांना आपल्यातील कला गुणांना एक योग्य असे व्यासपीठ प्राप्त होते तसेच आपल्या वैशिष्टयपूर्ण शैलीतून त्यांनी अनेक प्रमावरील कविता सादर करून हास्य विनोदा सोबतच कबीराच्या दोहयातून, संत जनाबाईच्या ओव्यातून तसेच बहीणाबाईच्या कवितेमधून प्रेमाचे अनन्य साधारण महत्व व अमरत्व सादर केले. आई विषयक भूमिका मांडतांना विद्यार्थ्यांना त्यानी अतिशय मार्मिक असे उदाहरण देऊन जगामध्ये आई किती सर्वश्रेष्ठ आहे ही भूमिका त्यांनी स्पष्ट केली. या बरोबरच त्यांनी मराठीतील व हिंदीतील विविध शब्दाच्या अर्थ्याची उकल केली. आई—वडीलांची सेवा हीच जगातील सर्वश्रेष्ठ सेवा आहे हा बहुमुल्य सल्ला यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

उद्‌घाटन सत्रा नंतर स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या विविध कला प्रकाराचे रंगारंग या कार्यक्रमामध्ये सादरीकरण करण्यात आले. यामध्ये गीत गायन मध्ये शिंदे दिपाली, रितेश

उबाळे, भाग्यश्री पोपते, उमा शिंदे, कविता वाचन मध्ये पुनम जांगीड, शरद नरवाडे, निकीता वाघ, प्रविण टेवरे मिमीक्री मध्ये राहूल गाढवे, कथाकथन सुप्रिया पंडीत, वैयक्तिक नृत्यामध्ये जयकूमार गुंजावळे तर समुह नृत्यामध्ये अमोल पाटील, पवन वाणी, महमूदईसीद मुहमद शकील लघू नाटीकेमध्ये प्रवीण टेवरे, पूजा होडबे, भागवत डांगे, विष्णू दिनकर, ज्ञानेश्वर लाबांडे, अश्विनी धाबे, संभाजी राऊत यांनी आपले कलागुण प्रदर्शित केले. याप्रसंगी शेला पागोटे चे वाचन प्रा. त्र्यंबक केंद्रे यांनी वैशिष्टयेपूर्ण शैलीत केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य तळणीकर एस.जी. यांनी विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठीच महाविद्यालयातील व्यासपीठ उपलब्ध असते व त्याचा योग्य उपयोग विद्यार्थ्यांनी घेतला पाहीजे असा मोलाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. वार्षिक स्नेहसंमेलनाचे उत्कृष्ठ संचलन प्रा. कैलास असेगावकर यांनी केले तर आभार प्रा. संजय फड यांनी व्यक्त केले. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयीन प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या वार्षिक स्नेहसंमेलन फेब्रुवारी—२०२० करीता महाविद्यालयीन विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# “वार्षिक स्नेह संमेलन फेब्रुवारी -२०२०” Annual Gathering 2020











# “वार्षिक स्नेह संमेलन फेब्रुवारी -२०२०”










